REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ हि धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ९ ऑक्टोबर, १९४० अंक ४१

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

## विविध माहिती

### मॉर्फिनच्या डोसवर नियंत्रण

जे वैद्य व हकीम १९३८ च्या मेडिकल प्रॅक्टिशनर्स कायद्याखालीं नोंदण्यांत आले असतील, अशांनाच ०.२% मॉर्फिन असलेलीं द्रव्यें दुसऱ्यास घेण्यास सांगतां येतील अगर विकतां येतील; इतरांस नाहीं, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

### आंध्र व्हॅली पॉवर कं. लि.

वरील कंपनीनें गेल्या वर्षी सुमारें १८ कोटि युनिट्स वीज विकली. कंपनीस एकूण उत्पन्न सुमारें ४८३ लक्ष रुपये झालें. निवळ नफा २२३ लक्ष रुपये उरला. ऑर्डिनरी भाग धारण करणारांस करमाफ ७३% डिव्हिडंड मिळालें. कंपनीच्या भागाची दर्शनी किंमत १,००० रुपये असून त्याचा बाजारभाव सुमारें १,६०० रुपये आहे.

### चहाच्या मळ्यांतील मजूर

हिंदी चहाच्या मळ्यांत सुमारें ९ लक्ष मजूर कामावर आहेत, त्यांपैकीं ५५ हजारांची नोकरी हंगामी स्वरूपाची आहे. आसाममधील चहाच्या मळ्यांतील कायम नोकरींतील पुरुष मजुरांस दरमहा सरासरी सुमारें ६ रु. १४ आ. पगार पडतो. स्त्री मजुरांच्या पगाराची सरासरी ५ रु. ६ आ. व मुलांच्या पगाराची सरासरी ३ रु. १३ आ. आहे.

### ब्रिटिश सरकारचा खर्च

चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत ब्रिटिश सरकारचा खर्च सुमारें २४ अब्ज रुपये झाला. गेल्या वर्षी ह्याच मुदतींत तो ८३ अब्जांपेक्षा अधिक नव्हता. चालू सालाच्या पहिल्या सहा महिन्यांत ब्रिटिश सरकारचें उत्पन्न ६३ अब्ज रुपये झालें. अपेक्षेप्रमाणें उत्पन्न होत आहे.

### प्रत्येक ४२ मिनिटांस एका विमानाचा बळी

ब्रिटिश विमान दलानें जर्मन विमानें खालीं पाडण्याचा गेले दोन महिने सपाटा चालविला आहे. प्रत्येक ४२ मिनिटांस एका जर्मन विमानाची शिकार होत आहे.

### टाटा हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर कं. लि.

वरील कंपनीनें गेल्या वर्षी सुमारें १३ कोटि युनिट्स वीज विकली. कंपनीस एकूण उत्पन्न सुमारें ४८३ लक्ष रुपये झालें. निवळ नफा २९३ लक्ष रुपये उरला. कंपनीच्या भागीदारांस ऑर्डिनरी भागावर करमाफ ७१% डिव्हिडंड मिळालें. भागाची दर्शनी किंमत १०० रुपये असून त्याचा बाजारभाव सुमारें १७० रुपये आहे.

### जपानी सायकली

जपानमध्यें सायकलींचा वापर वाढत आहे. प्रत्येक १० लोकांचे मागें १ सायकल असें तेथें प्रमाण पडतें. स्थानिक खप पुष्कळ व निर्गतहि मोठी, ह्यामुळें तेथील सायकलींचे कारखाने जोरांत चालू आहेत. लहान व मध्यम आकाराच्या कारखान्यांत सायकलींचे निरनिराळे २० सुटे भाग करण्यांत येतात, त्यामुळें उत्पादनाचा खर्च कमी येतो.

### ग्रेट ब्रिटनमध्यें विक्रीवरील कर

एप्रिलमधील ब्रिटिश बजेटांतील मालाचे विक्रीवरील कराची अंमलबजावणी ता. २१ ऑक्टोबरपासून सुरू होईल. रोज लागणाऱ्या वस्तूंवरहि तो बोजा लागेल व चैनीच्या वस्तूंवर त्याचा बोजा अर्थातच अधिक बसेल.

### ओरिएंटल विमा कंपनी

वरील कंपनीनें आपल्या विमेदारांस दरसाल दरहजारीं, हयातीनंतरच्या विम्यावर १५ रुपये व हयातींतील विम्यावर १२ रुपये ह्या दरानें बोनस दिलें आहे. भागीदारांस प्रत्येक भागावर १२५ रुपये डिव्हिडंड मिळालें. कंपनीच्या, २०० रुपये दर्शनी किंमतीच्या भागाची किंमत सुमारें ३,६५० रुपये आहे.

### ट्रेझरी बिलांवरील व्याजाचे दरांत तफावत

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. १० पै पडला. रिझर्व्ह बँकेनें बंगाल सरकारचीं ५० लक्ष रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा दर द. सा. द. शे. १५ आणे पडला. हिंदुस्थान सरकारास २ कोटींची रकम हवी होती, त्यासाठी ३ कोटि, २० लक्ष रुपयांचे अर्ज आले. मद्रास सरकारास ५० लक्ष रुपयांची आवश्यकता होती व ५२ लाखांचे अर्ज आले.

### दारूची आयात चालू आहे

फ्रान्समधून दारूची आयात हिंदुस्थानांत होत असे, तिची जागा आतां दक्षिण आफ्रिकेंतून व ऑस्ट्रेलियांतून येणाऱ्या दारूनें घेतली आहे. युद्धामुळें दारू पिणारांची गैरसोय झालेली नाहीं.

### ठेवी वाढवा

नंदुरबार अर्बन को-बँकेची वार्षिक सभा श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचे अध्यक्षतेखालीं नुकतीच झाली. बँकेनें आपल्या खेळत्या भांडवलासाठीं प्रांतिक बँकेवर अवलंबून न रहातां, वेगवेगळ्या तऱ्हेच्या ठेवी स्वीकारून स्वतःचें भांडवल जमवावें, असें अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत सांगितलें.

### युद्ध-मंत्रिमंडळांतील सभासदांचें वय

ब्रिटिश 'युद्ध' मंत्रिमंडळांतील मंत्र्यांचें सरासरी वय ५९३ वर्षें आहे. मुख्य प्रधान मि. चर्चिल हे ६५ वर्षांचे असून ते सर्वांत वडील आहेत. नवीनच दाखल झालेले मि. बेव्हिन ह्यांचें वय ५६ असून ते वयानें सर्वांत लहान आहेत.

### मि. चेंबर्लेन ह्यांचा राजीनामा

मि. चेंबर्लेन ह्यांनीं युद्ध-मंत्रिमंडळांतील आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे. त्यांचे जागीं सर जॉन अँडरसन ह्यांस लॉर्ड प्रेसिडेंट ऑफ दि कौन्सिल नेमण्यांत आलें आहे. मि. चेंबर्लेन ह्यांचा राजीनामा स्वीकारतांना मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं त्यांस खालीलप्रमाणें पत्र लिहिलें आहे:—"मी तुमचे हाताखालीं मंत्रिमंडळांत काम करीत होतों, ती वेळ संपल्यापासून तुम्हीं मला जी मदत केली त्यामुळें परिस्थिति पुष्कळच सुधारली असून युद्धाचा निकाल आतां आपल्या बाजूनें फिरल्या सारखाच आहे. विजयप्राप्तीसाठीं तुम्हीं शक्य तें सर्व केलें."

### श्रीमंतांनीं मोठा बोजा उचलावा

"पंजाब प्रांतांतील लहानसहान जमीनदार युद्धफंडास सढळ हातानें पैसे देत आहेत, परंतु श्रीमान जमीनदार आपलें कर्तव्य टाळीत आहेत. देशाच्या संरक्षणास त्यांनीं स्वतःच्या हितासाठीं तरी हातभार लावणें आवश्यक आहे," असें पंजाबचे पंतप्रधान, सर शिकंदर हयातखान, हे आपल्या एका भाषणांत नुकतेच म्हणाले.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ४८२ | ५ मुंबई प्रांतांतील वीज कंपन्या ... | ४८६ |
| २ इंग्लंडची वाढती संपत्ती | ४८३ | ६ सार्वभौमत्व विरुद्ध साम्राज्यशाही ... | ४८७ |
| ३ युद्धपरिस्थिति आणि स्वदेशी धंदे व व्यापार | ४८४ | ७ पैशाच्या वर्गावर्गीची सवलत ... | ४८८ |
| ४ स्फुट विचार ... | ४८५ | ८ मुंबई प्रांतांतील शिक्षण-प्रगति ... | ४८९ |
| रिझर्व्ह बँकेची योजना आणि सहकारी संस्था–मजूर चळवळींतील ऐक्य—जर्मनी-इटली-जपान त्रिकुट–त्रिकुटाचें कारस्थान | | ९ सहकारी संस्थांचे अहवाल | ४९० |
| | | १० निवडक बाजारभाव | ४९१ |



# अर्थ

बुधवार, ता. ९ ऑक्टोबर, १९४०


## इंग्लंडची वाढती संपत्ती

### आर्थिक नियोजनाचा सुपरिणाम

युद्ध म्हटलें म्हणजे संपत्तीची ती होळीच होय. अलीकडे ज्या प्रमाणावर युद्धखर्च करावा लागतो तें ध्यानांत घेतल्यास असेंच दीर्घकाल युद्ध चालल्यास महान् श्रीमंत राष्ट्रांसहि दरिद्री बनावें लागेल अशी भीति वाटावयास लागते. युद्ध चालविण्यास दररोज ८-१० कोटि रुपयांचा ब्रिटिश सरकारास खर्च करावा लागतो ही एकच गोष्ट ध्यानांत घेतल्यास युद्धांत संपत्तीचा केवढ्या प्रमाणांत नाश होत आहे त्याची कल्पना येईल. असें असूनहि युद्ध सुरू होऊन वर्ष होऊन गेलें तरी आज इंग्लंडची संपत्ति तीन वर्षांपूर्वीहून अधिक आहे असें अधिकृतपणें जाहीर करण्यांत येत आहे. ही घोषणा एखाद्या राजकारणी पुढाऱ्यानें केली असती तर ती केवळ बढाई मारण्याकरितां किंवा स्वदेशीयांत उत्साह उत्पन्न करण्याकरितां केली असेल अशी शंका घेतां आली असती. परंतु अप्रिय सत्य सांगण्यास जे आजवर केव्हांच कचरले नाहींत किंबहुना अप्रिय गोष्टींचें भविष्य वर्तविण्याबद्दल ज्यांची विशेष ख्याति आहे, असे प्रसिद्ध इंग्रज अर्थशास्त्रज्ञ प्रो. केन्स ह्यांनीं इंग्लंडच्या वाढत्या संपत्तीबद्दल निर्वाळा दिला असल्यानें इंग्लंडचे शत्रू व मित्र हे दोघेहि कांहींसे आश्चर्यचकित झाले आहेत.

इंग्लंडची संपत्ति आज १९३७ सालाहून अधिक आहे एवढेंच सांगितल्यानें युद्धाचा इंग्रज नागरिकाच्या सामान्य जीवनक्रमावर काय परिणाम होणार आहे हें स्पष्ट होत नाहीं. ह्या प्रश्नास प्रो. केन्स ह्यांचें असें उत्तर आहे कीं युद्ध जरी चार वर्षें चाललें तरी युद्धानंतरच्या काळांत इंग्रज नागरिकांचें राहणीचें मान युद्धपूर्वकालाहून कमी दर्जाचें न होतां तें वाढलेलें दिसेल. हीं सर्व विधानें सामान्य मनुष्यास तरी अतिशयोक्तीचीं वाटल्याशिवाय रहाणार नाहींत, परंतु जरा खोल विचार केल्यास प्रो. केन्स ह्यांचीं वर वर भरमसाट वाटणारीं हीं विधानें अर्थपूर्ण आहेत एवढेंच नव्हे तर त्यांपासून आपणांस बराच बोध घेण्यासारखा आहे असें दिसेल.

पूर्वीच्या कोणत्याहि युद्धापेक्षा चालू युद्धांत प्रामुख्यानें आढळणारी गोष्ट म्हणजे विमानी हल्ल्यानें मोठमोठ्या शहरांचें होणारें नुकसान ही होय. ह्या नाश मुळीं होतच नाहीं असें कोणासही म्हणतां येणार नाहीं.परंतु एकंदर देशांतील सांठविलेली संपत्ति व चालू उत्पादन-सामर्थ्य ह्यांचा विचार करतां इंग्लंडचें विमानी हल्ल्यांमुळें होणारें नुकसान त्या राष्ट्राच्या सामान्य उत्पादन सामर्थ्याच्या सीमेपलीकडे आहे असें नाहीं. लंडनमध्यें आज जो कांहीं घरादारांचा व इतर सार्वजनिक बांधकामांचा नाश होत आहे तो तेथील प्रतिवार्षिक नव्या बांधकामांच्या आवांक्याबाहेरचा नाहीं. हीच गोष्ट प्रो. केन्स ह्यांनीं निराळ्या शब्दांत मांडतांना असें म्हटलें आहे कीं, प्रतिदिवशीं दीड कोटि रुपयांप्रमाणें ४ वर्षें ब्रिटिश मालमत्तेचें नुकसान झालें तरी तें २ वर्षांत भरून काढण्यास इंग्लंड समर्थ आहे. अर्थातच संपत्तीचा नाश होणें ही गोष्ट मुळांत अनर्थावह आहे व झालेला नाश भरून काढण्यास थोडाफार वेळ लागणार, ही गोष्ट प्रो. केन्स ह्यांसहि कबूल आहे.

प्रो. केन्स ह्यांस इंग्लंडच्या चालू व भविष्यकालीन आर्थिक परिस्थितीबद्दल जो विश्वास वाटत आहे त्याची दोन प्रमुख कारणें आहेत. युद्धाच्या तयारीस सुरुवात होण्यापूर्वी कित्येक वर्षे इंग्लंडमध्यें आर्थिक मंदी होती. इंग्लंडचा मुख्य व्यवसाय परराष्ट्रांस माल पुरविण्याचा असल्यानें ही मंदी इंग्रज धंदेवाल्यांस विशेष जाणवली. यंत्रसामुग्री, भांडवल, उत्पादनाचीं इतर साधनें व कामकरी ह्यांचा बराच मोठा भाग व्यवसायहीन होऊन पडला होता. पहिल्या प्रथम युद्धाप्रीत्यर्थ होणाऱ्या तयारीनें ह्या साधनांचा पूर्ण उपयोग होण्यास सुरुवात झाली व आतां युद्धांत खर्च होणाऱ्या संपत्तीच्या व साधनांच्या जागीं नवी संपत्ती व साधनें उत्पन्न करण्याकडे राष्ट्राच्या उत्पादक संघटनेचा पूर्णतः उपयोग केला जात आहे. अनेक तज्ज्ञांच्या मतें आजहि इंग्लंडच्या उत्पादक साधनांचा पूर्णपणें उपयोग होत नसून सध्यापेक्षा अधिक उत्पादन करणें इंग्लंडला शक्य आहे.

जर्मनीनें आज ५–७ वर्षें आपलें सर्व उत्पादनसामर्थ्य आटोकाट उपयोगांत आणून युद्धाची तयारी केलेली असल्यानें युद्धांत होणारा संपत्तीचा नाश भरून काढणें त्या राष्ट्रास सोपें जाणार नाहीं. तुलनात्मक दृष्टीनें पाहतां इंग्लंडचीं साधनें जर्मनीच्या साधनांच्या मानानें दिवसेंदिवस अधिक प्रभावी ठरणार हें स्पष्ट दिसतें. उत्पादनसाधनांपैकीं कामकरी वर्ग हें एक प्रमुख साधन आहे. फ्रान्सचा पराजय होऊन युद्धाला अगदी निकराचें स्वरूप येईपर्यंत इंग्लंडमध्यें कामकऱ्यांबद्दलचे नेहमींचे संरक्षक कायदे चालू होते. लाखों लोकांस बेकारी भत्ता मिळत होता व ज्यांस रोजगार होता त्यांचे कामाचे तासहि नियमित होते. आतां सर्वसामान्य कायदे बाजूस ठेवून असाधारण परिस्थितीमुळें देशांतील सर्व लोक व सर्व सामुग्री ह्यांचा एका धोरणानें उपयोग होऊं लागल्यानें उत्पादनांत अपेक्षेबाहेर भर पडत आहे. इंग्लंड व इंग्लंडचे मित्र ह्यांस अंतिम विजयाबद्दल जो विश्वास वाटत आहे तो ह्या उत्पादन सामर्थ्यामुळेंच होय.

राष्ट्राच्या आर्थिक जीवनांत व्यक्ती व वर्ग ह्यांच्या परस्पर स्पर्धेस वाजवीपेक्षा अधिक वाव दिल्यास विषमता व मंदी ह्यांसारखी अरिष्टें उत्पन्न होतात हें आतां सर्वांस कळून चुकलें आहे. त्याचप्रमाणें नियोजनाच्या अभावीं राष्ट्रीय संपत्तीचें उत्पादनहि

क्षमतेतून किती कमी होतें त्याचा आतां पडताळा आला आहे. बहुजन समाजाच्या हिताच्या दृष्टीनें राष्ट्रांतील सर्व साधनांचा उपयोग करण्याची योजना करून ती नेटानें अंमलांत आणल्यास संपत्तीची अधिकांत अधिक वाढ होऊं शकते. ही वाढ युद्धकाळीं संरक्षणार्थ, तर शांततेच्या काळीं समाजाचें राहणीचें मान वाढविण्यास उपयोगी पडेल. व्यक्तिनिष्ठ स्पर्धेवर अवलंबून असलेली आर्थिक घटना आतां इंग्लंडमध्यें नाहींशी होत आहे, व तिच्याऐवजीं नियोजनात्मक राष्ट्रीय संघटना उत्पन्न होत आहे. युद्ध संपलें तरी ही घटना आतां नाहींशी होणार नाहीं. युद्धोत्तर कालांत रहाणीचें मान वाढेल असें तज्ज्ञांस वाटत आहे त्याचें मुख्य कारण आर्थिक नियोजनाच्या धोरणाची संस्थापना हेंच होय.

हिंदुस्थानांतील आर्थिक जीवनासहि नियोजनाची फार जरूर आहे असें आज कित्येक वर्षें येथील तज्ज्ञ व पुढारी म्हणत आहेत. परंतु इंग्रज सरकारला हें धोरण पसंत नसल्यानें हिंदुस्थान सरकारचाहि त्यास विरोध होता. हिंदुस्थानाचें दारिद्र्य निवारण करण्यास व राष्ट्रीय संरक्षणाची जय्यत तयारी ठेवण्यास आर्थिक नियोजनाची आवश्यकता आहे. हें नियोजन राष्ट्रहितार्थ होण्यास त्यास नागरिकांचें उत्साहपूर्ण सहकार्य मिळविलें गेलें पाहिजे. देशांतील राजकीय असमाधानाचें वातावरण दूर करून सर्वांच्या साहाय्यानें औद्योगिक संवर्धनाचें धोरण आंखणें हेंच हिंदुस्थान व इंग्लंड ह्या दोहोंच्याहि दृष्टीनें मुत्सद्देगिरीचें ठरणार आहे.

---

## युद्धपरिस्थिति आणि स्वदेशी धंदे व व्यापार

काल आणि क्षेत्र ह्या दोन्ही बाजूंनीं युद्धाचा प्रसार होत असल्यानें आणि रणभूमीच्या मर्यादा हिंदुस्थानाच्या जवळ येऊन भिडूं लागल्याकारणानें युद्धोपयोगी सामुग्रीचें उत्पादन व तिची देवघेव ह्यांचे बाबतींत जोराच्या घडामोडी चालू झाल्या आहेत. ह्या संबंधांतील विस्तार आणि प्रगति ह्यांची कल्पना येण्यास हिंदी उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांचे क्षेत्रांत होणाऱ्या उलाढालींची संकलित माहिती वेळोवेळ देणें आवश्यक आहे.

***

युद्धसामुग्रीपैकी दारुगोळा करण्याचे कारखाने हिंदुस्थानांत आज अनेक वर्षें आहेत आणि त्यांत मागणीपुरतें भरपूर उत्पादन होत आलें आहे. ह्या मालास युद्धामुळें अधिक मोठ्या प्रमाणावर मागणी येत असल्यानें दारुगोळ्याच्या कारखान्यांचें उत्पादन सामर्थ्य वाढवलें जाणें सहाजिक आहे. ह्या बाबतींत हिंदुस्थान स्वयंपूर्ण होत आहे, एवढेंच नव्हे तर हिंदी माल जरूरीच्या ठिकाणीं पाठवण्याची शक्तीहि त्यामध्यें निर्माण झाली आहे.

***

चिलखती व सशस्त्र रणगाडे अलीकडच्या युद्ध पद्धतींत अत्यंत आवश्यक आहेत. आतापर्यंत त्यांचें उत्पादन हिंदुस्थानांत होत नसे. त्यास लागणारी यंत्रसामुग्री व सोय येथें नव्हती आणि त्यांची आयात इंग्लंडहून करतां आली असती. युद्धपरिस्थितीमुळें ही गोष्ट आतां शक्य नाहीं. ह्या प्रकारच्या युद्धसामुग्रीचे बाबतींत हिंदुस्थानास स्वावलंबी झालें पाहिजे. राष्ट्राच्या संरक्षणासाठी आणि युद्ध यशस्वी होण्यास सहाय देण्यासाठी ह्या देशानें चिलखती रणगाड्यांचे सारखी सामुग्री स्वतः बनवणें जरूर झालें आहे. एका रेल्वेच्या कारखान्यांत रणगाडे बनवण्याची तजवीज होत असल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. हिंदी कारखान्यांतील उत्पादनास मिळणाऱ्या ह्या नवीन वळणावरून देशी धंद्यांचा विस्तार कोणत्या दिशेनें होत आहे, हें दिसून येईल.

***

आरमारी खात्याच्या उपयोगासाठीं लहान जहाजें हवीं आहेत, आणि त्यांचे संबंधांत ३९ लक्ष रुपये किंमतीची ऑर्डर ह्या देशास अलीकडे मिळाली आहे. समुद्रावरील संरक्षणाच्या आधुनिक पद्धतीच्या साधनांचा पुरवठा करण्याचा ह्या प्रश्न असून त्या बाबतींत हिंदी कारखान्यांत उत्पादन होऊं लागलें आहे, ही महत्वाची गोष्ट आहे. चालू युद्धांत निकडीची गरज भागवण्याची ही बाब आहे आणि तिच्या योगानें देशांतील कारखान्यांस नवीन व वाढतें काम मिळत आहे.

***

बॉक्साइट, ह्या खनिज द्रव्याचें ॲल्यूमिनियम करण्याची कल्पना ह्या देशांत युद्धाचे पूर्वींच निघाली होती. युद्धाच्या निकडीच्या मागणीमुळें ह्या धंद्यास आतां जोराची चालना मिळत आहे. ॲल्युमिनियमच्या उत्पादनाच्या योजनांचा विचार जोरानें चालला आहे.

***

अनेक जातींच्या हिंदी मालास देशाचे बाहेर युद्धामुळें मागणी येत आहे. हिंदी दगडी कोळसा मध्य एशियाच्या बाजूस हवा आहे आणि तो पुरवला जाण्याची व्यवस्था होत आहे. जनावरांच्या विशिष्ट जातींच्या कातड्यांस अशीच बाहेरची मागणी आली आहे. गेल्या सहा महिन्यांत ऑस्ट्रेलियन सैनिकांकरितां एक हजार टन हिंदी चहा खरेदी करण्यांत आला आहे. पोलादाचें बांधणीचें तयार सामान आणि कित्येक शस्त्रें खाजगी कारखानदार पुरवीत आहेत. इराक, इजिप्त, सिंगापूर ह्यांची इमारतीचें लाकूड, कापड, एंजिनिअरिंगचें सामान ह्यांची पुरवठ्याविषयींची चौकशी होत आहे.

***

युद्धोपयोगी व्यवसायशिक्षण देऊन कुशल कारागीर तयार करण्याची हिंदुस्थान सरकारची योजना लवकरच अमलांत यावयाची आहे. उमेदवारांच्या निवडीस चालू आठवड्यांत प्रारंभ होईल. ह्या योजनेची तपशीलवार माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

***

लढाऊ उपयोगाच्या सामानाचा पुरवठा हिंदुस्थानांत पद्धतशीर रीतीनें कसा होईल ह्याविषयीं चौकशी करून व्यवस्था सुचवण्यासाठी इंग्लंडहून आलेले सर अलेक्झांडर रॉजर हे प्रमुख औद्योगिक व व्यापारी शहरांस भेट देत आहेत. स्थानिक धंदेवाल्यांच्या पुढाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्याशीं त्यांनीं विचारविनिमय चालवला आहे. कलकत्त्यास गेल्या आठवड्यांत चर्चा झाली, तीमध्यें हिंदी व्यापाऱ्यांनीं आपल्या मार्गांतल्या अडचणी सर अलेक्झांडर ह्यांस समजाऊन सांगितल्या. हिंदुस्थान सरकारचें माल पुरवठा खातें आणि हिंदी धंदेवाले ह्यांचें सहकार्य अधिक निकट झालें पाहिजे आणि विमानें, जहाजें, रासायनिक द्रव्यें इत्यादि मालाचे मूलग्राही धंदे हिंदुस्थानांत काढले गेले पाहिजेत असें त्यांनीं सुचवलें. सर अलेक्झांडर ह्यांच्याबरोबर आलेले तज्ज्ञ जमशेदपूरसारख्या कारखान्यांमध्यें जाऊन हिंदी धंद्यांची माहिती करून घेत आहेत.

***

# स्फुट विचार

### रिझर्व्ह बँकेची योजना आणि सहकारी संस्था

सहकारी चळवळ शेतकऱ्यांसारख्या गरीब वर्गाच्या हितासाठी असल्यानें रजिस्ट्रेशन व स्टॅम्स ह्या करांची माफी त्यास प्रांतिक सरकारनें दिली आहे. सहकारी संस्थांचा पैसा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठविण्याचे बाबतींत हिंदुस्थान सरकारहि आजपर्यंत त्यांस सवलत देत आलें आहे. सहकारी कामासाठी पैशाची वर्गावर्गी व्हावयाची असतां ती सरकारी तिजोऱ्यांचेमार्फत मोफत करण्यांत येत असे. शेतकी पतपेढ्यांसाठी बँकांनीं पैसा पाठवण्यांत आणि पतपेढ्यांनीं बँकांच्या देण्याची परतफेड करण्यांत खर्च पडल्यास त्याचा बोजा अखेरीस शेतकऱ्यांसच सोसावा लागणार आणि ह्या लोकांस स्वस्त दरानें भांडवल मिळून त्यांची बचत व्हावी हा सरकारचा व सहकारी चळवळीचा उद्देश आहे. परंतु पैशाची वर्गावर्गी करण्याचे बाबतींत रिझर्व्ह बँकेनें अलीकडे नियम प्रसिद्ध केले आहेत, त्यांचे योगानें हा हेतु निष्फळ होत आहे. ह्यासंबंधांतल्या रिझर्व्ह बँकेच्या योजनेची कल्पना त्रोटक रीतीनें मागील एका अंकांत आम्हीं दिली आहे. ह्या योजनेंत सहकारी संस्थांस मिळत असलेल्या सवलतीचा अंतर्भाव केलेला नाहीं आणि त्यांस इतर लोकांप्रमाणें पैशाची वर्गावर्गी करण्याबद्दल ठराविक दरानें कमिशन द्यावें लागणार आहे. शेड्यूल्ड बँकांस देण्यांत येणाऱ्या सवलतीहि प्रांतिक सहकारा बँकांस मिळणार नाहींत. ह्यासाठी सहकारी संस्थांनीं प्रांतिक सरकार आणि मध्यवर्ती सरकार ह्यांच्यामार्फत रिझर्व्ह बँकेकडे दाद मागितली पाहिजे. शेतीच्या मालाचे बाजारभाव एकीकडे पडले आहेत आणि सहकारी पतपेढ्यांची सांपत्तिक स्थिति सुधारण्याचे यत्न चालू आहेत. अशा वेळीं रिझर्व्ह बँकेनें आजपर्यंत अमलांत असलेलें धोरण बदलणें योग्य नाहीं. प्रांतिक सहकारी बँकांस तरी निदान शेड्यूल्ड बँकांच्या बरोबरीनें वागवण्यांत आलें पाहिजे.

---

### मजूर चळवळींतील ऐक्य

ऑल इंडिया ट्रेड यूनियन काँग्रेस ह्या साधारणतः जहाल समजल्या जाणाऱ्या मजूर संस्थेंतून फुटून निघून १९२९ सालीं नॅशनल ट्रेड्स यूनियन फेडरेशन ही संस्था नेमस्त मजूर पुढाऱ्यांनीं सुरू केली होती. मजुरांच्या चळवळींत तात्त्विक अगर राजकीय मतभेद फारसे माजूं न देतां मजुरांची प्रत्यक्ष स्थिति सुधारण्याकडे मजूर संस्थांनीं लक्ष द्यावें हें त्या वेळचें नेमस्त पक्षाचें म्हणणें काँग्रेसमधील जहाल पुढाऱ्यांस पटत नव्हतें. मजुरांतील असंतोषाचा फायदा घेऊन त्यांच्यांत आत्यंतिक साम्यवादाचा प्रसार करावयाचा व त्यांच्या संघटित प्रयत्नांनीं सामाजिक क्रांति घडवून आणावयाची असें त्यांचें धोरण होतें. अनुभवानें हें धोरण अव्यवहार्य व आत्मघातकी ठरल्यानें आपणांतील फुटून गेलेले नामवंत पुढारी परत आपल्यांत यावे व मजूर चळवळ एकोप्यानें चालावी असें काँग्रेसवाल्या पुढाऱ्यांस १९३८ पासून वाटूं लागलें. फेडरेशनचे पुढारी एकीला तयार असूनहि त्यांस जुन्या जहालांचें खरोखर मतपरिवर्तन किती झालें आहे हें आजमावयाचें होतें. म्हणून गेल्या दोन वर्षें ह्या दोन्ही संस्थांनीं आपापलें घटनाविषयक अस्तित्व निराळें ठेवून एकोप्यानें कार्य केलें. ह्या सहकार्यानें फेडरेशनमधील नेमस्त मजूर पुढारी काँग्रेसच्या धोरणाबद्दल निःशंक झालेले दिसतात. तसें नसतें तर परवां मुंबईस फेडरेशननें आपलें स्वतंत्र अस्तित्व आपखुषीनें संपुष्टांत आणलें, तसें आणलें नसतें. चालू युद्धाबद्दल काँग्रेसनें जो ठराव मान्य केला व अध्यक्षपदाच्या निवडणुकीबद्दल ज्या वाटाघाटी झाल्या त्यांवरून मजूर पुढाऱ्यांस व्यवहारी अर्थकारणांत नेमस्तपणा स्वीकारणें मजुरांच्या हिताचें असतें ही गोष्ट थोडीबहुत पटावयास लागली आहे असें दिसतें. असें असेल तर देशाच्या आर्थिक प्रगतीस तो एक शुभशकुनच झाला असें म्हटलें पाहिजे. तत्त्वपालनाकरितां ज्या नेमस्त पुढाऱ्यांनीं अनेक आक्षेप सहन करून आपली स्वतंत्र संस्था इतके दिवस टिकविली त्यांनीं आज आपल्या हातानें तिचा अंत केला ह्यांत मुत्सद्देगिरी आहे कां आत्मघातकीपणा आहे हें क्रमाक्रमानें कळेलच.

---

### जर्मनी–इटली–जपान त्रिकूट

जागतिक राजकारणांत गेल्या आठवड्यांत घडलेली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे जर्मनी, इटली व जपान ह्यांचेमध्यें झालेला दशवार्षिक करार ही होय. हा करार राजकीय, आर्थिक व युद्धविषयक स्वरूपाचा आहे आणि त्याचा उद्देश ह्या त्रिविध बाबतींत जगाची नवी घडी बसवणें हा आहे असें त्याच्या पुरस्कर्त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. युरोपिअन राष्ट्रांचें संघटन नवीन तत्त्वांवर करण्याचा चंग हिटलरनें बांधलाच आहे आणि त्यासाठी त्यानें एकामागून एक असे अनेक देश आपल्या कह्यांत आणले आहेत. जागतिक पुनर्रचनेच्या अंगीकृत कार्यांत त्यानें मुसोलिनीस साथीदार घेतला आहे. शेजारच्या देशांच्या स्वातंत्र्याचें हरण करण्याचें कार्य युरोपांत जर्मनी करीत असतां एशिया खंडांत जपानला त्याविषयीं जोराची स्फूर्ति मिळाली आहे. मँचूकाओ व चीनचा मोठा भाग गिळंकृत केल्यानें जपानचें समाधान न होतां एशियांतला जर्मनी बनण्याची महत्त्वाकांक्षा त्यास झाली. स्वतःचें राजकीय व आर्थिक सामर्थ्य वाढवण्यासाठी परकी राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा अपहार करावयाचा हें जर्मनी व इटली ह्यांचें धोरण जपाननें अगोदरच अवलंबिलें होतें. आतां उघड करार करून ह्या तीन राष्ट्रांनीं आपल्या धोरणाचें स्वरूप जगजाहीर केलें आहे. राज्यकर्त्यांनीं स्वतःच्या लोकांसहि विचार, मत व भाषण ह्यांचें स्वातंत्र्य द्यावयाचें नाहीं आणि जगावरची राजकीय सत्ता वांटून घ्यावयाची अशी प्रस्तुत कराराची योजना आहे. तीमध्यें रशियाचा अंतर्भाव झालेला नाहीं आणि ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांचेविरुद्ध तिचा रोख आहे हें उघड आहे. स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रांस वरील त्रिकुटानें दिलेलें हें आव्हान आहे. प्रस्तुत युद्धाचे दृष्टीनें कराराचा उपयोग करून घ्यावयाचा असा हिटलर व मुसोलिनी ह्यांचा डाव आहे. जपानच्या धोरणाची कल्पना ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांस पूर्वींच आलेली असल्यानें जागतिक परिस्थितींत एकदम पालट झाला असें म्हणण्याचें कारण नाहीं.

---

### त्रिकुटाचें कारस्थान

पश्चिमेस जर्मनी, पूर्वेस जपान आणि आफ्रिका खंडांत इटली अशा रीतीनें जगाचें राज्य वांटून घेण्याची ह्या तीन राष्ट्रांची योजना आहे. तिच्या अन्वयें युरोप खंडाचें पुढारीपण जर्मनी व इटली ह्यांस बहाल करण्यांत आलें आहे. मी पश्चिम युरोप खातों, तूं आफ्रिका खा असें हिटलर आणि मुसोलिनी ह्यांचें संगनमत झालें आहे. आपले प्रतिस्पर्धी इंग्लंड व अमेरिका ह्यांस पूर्वेकडे पायबंद बसावा म्हणून ह्या दोघांनीं जपानला कटांत सामील

करून घेतलें आहे आणि पूर्व एशियांत हातपाय पसरण्यास त्यास मोकळीक दिली आहे. पूर्व एशियांत जपानला अमेरिकेचा अडथळा होतो आणि पश्चिमेचे बाजूस इंग्लंडला अमेरिकेचें सहाय होत आहे तें जर्मनीस पहावत नाहीं. अशा स्थितींत जर्मनी व जपान ह्यांचा करार परस्परांस हितावह आहे. अमेरिकेसारखें त्रयस्थ राष्ट्र पश्चिमेच्या बाजूस किंवा चीन-जपान युद्धांत मध्यें पडेल तर त्याच्या विरुद्ध त्रिकुटानें एकजुटीनें लढावें असें त्यांच्या करारांत स्पष्ट म्हटलें आहे. ह्या कराराची अंमलबजावणी होण्यासाठीं एक तज्ञसमिति तात्काळ नेमण्यांत येणार आहे. नवीन कराराचे योगानें त्रिकुटांतील राष्ट्रांच्या रशियाशीं असलेल्या संबंधास बाध येणार नाहीं असेंहि त्यांत नमूद करण्यांत आलें आहे. त्रिकुटानें योजलेल्या जगाचे वांटणींत रशियास स्थान देण्यांत आलेलें नाहीं. त्याच्या तोंडावर कांहींतरी फेंकण्याची आणि त्यास गप्प बसवण्याची व्यवस्था जर्मनीनें तयार केली असली पाहिजे. हा करार हें अमेरिकेस त्रिकुटानें केलेलें आव्हानच असल्यानें त्या राष्ट्रास प्रस्तुत युद्धाचे बाहेर फार वेळ रहाणें आतां शक्य दिसत नाहीं. स्पेनला युद्धांत खेचण्याचे आटोकाट प्रयत्न जर्मनीनें चालवले आहेत, पण अजून त्यांस यश आलेलें नाहीं.

## मुंबई प्रांतांतील वीज कंपन्या

उंचीवरील पाणी खालीं आणून त्यापासून वीज निर्माण करण्यास मुंबई प्रांतांत अनुकूल परिस्थिति आहे. परंतु तिचा फायदा अद्याप पूर्णत्वानें घेतला गेलेला नाहीं. इतर प्रांतांचे मानानें अर्थात मुंबई प्रांत विजेच्या उत्पादनाचे बाबत पुष्कळच पुढें आहे. मुंबई प्रांतांत एकूण ६६ वीज कंपन्या आहेत, त्यांपैकीं १२ अगदीं नवीन आहेत. विजेच्या उत्पादनाचे आकडे खालीं दिले आहेतः-

मुंबई प्रांतांतील विजेचें उत्पादन

| | कंपन्यांची संख्या | उत्पादित यूनिट्स | दशलक्ष यूनिट्स | |
|---|---|---|---|---|
| | | | विकलेलीं यूनिट्स | औद्योगिक कारणांकरितां विकलेलीं यूनिट्स |
| मुंबई शहर | ४ | ५८६·० | ५०३·० | २८४·० |
| उत्तर भाग | १८ | २४·६ | २३·९ | १७·७ |
| मध्य भाग | ३१ | ४·४ | ३·८ | २·२ |
| दक्षिण भाग | १३ | २·० | १·६ | ०·७ |
| | ६६ | ६१७·० | ५३२·३ | ३०४·६ |

एकूण आठ कंपन्या टाटा हायड्रो इलेक्ट्रिक सप्लाय कंपन्यांकडून वीज घाऊक घेऊन किरकोळीनें विकतात. उद्योगधंद्याकरितां जितक्या विजेचा उपयोग केला जातो, तिच्यापैकीं ९२% वीज मुंबईंत खपते. त्यानंतर उत्तर भाग, मध्यभाग व दक्षिण भाग असा अनुक्रम लागतो.

उत्तर विभागांत अहमदाबाद, सुरत, मुंबई उपनगर, वगैरे उद्योगधंद्यांत पुढारलेले जिल्हे आहेत. दक्षिण भाग म्हणजे कर्नाटक व कोंकण उद्योगधंद्यांचे बाबतींत फार मागें आहे. मुंबई प्रांतांत पाण्यावर वीज करतां येईल, अशीं अनेक ठिकाणें अद्याप शिल्लक आहेत. मध्यविभागांत, साताऱ्याजवळ उरमोडी नदी, महाबळेश्वर शेजारीं वेण्णा नदी, भंडारदरा धरणाजवळ प्रवरा नदी, नाशिक जिल्ह्यांत दमणगंगा नदी व वेतर्णा नदी, इत्यादि नद्यांचें पाणी विजेच्या उत्पादनास उपयोगी पडण्याजोगें आहे. मुंबई प्रांतांत वीज निर्माण कोठें करतां येईल, ह्याबाबत चौकशी करण्याचें काम प्रांतिक सरकारनें आपला इलेक्ट्रिकल इंजिनिअर व डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज ह्यांजकडे सोंपविलें आहे. त्यांचा रिपोर्ट अद्याप तयार होत आहे. गॅस, वाफ व तेल ह्यांचाहि धंदे चालविण्याकडे उपयोग होतो. गॅस वापरणारे मुंबईंत सुमारें ११ हजार छोटेखानी कारखाने आहेत.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन; कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ). | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००० चेवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## सार्वभौमत्व विरुद्ध साम्राज्यशाही

वेस्ट इंडिज बेटांतील हॅवाना ह्या तंबाकूमुळें प्रसिद्ध असणाऱ्या शहरीं सर्व अमेरिकन राष्ट्रांची एक परिषद नुकतीच भरली होती. परिषदेस एकंदर २१ अमेरिकन प्रजासत्ताक राष्ट्रांचे प्रतिनिधि हजर होते. अमेरिकेखेरीज इतर खंडांतील राष्ट्रांमध्यें आज ज्या घडामोडी होत आहेत त्यांचा अनिष्ट परिणाम अमेरिकेंतील त्या राष्ट्रांच्या वसाहतींवर होऊं नये, एवढ्याकरितां वरील परिषदेनें एक सर्वमान्य ठराव केला आहे. २१ पैकीं निदान १४ राष्ट्रांच्या सरकारांची त्यास मान्यता मिळतांच तो अंमलांत येणार आहे. ह्या ठरावानुसार राज्यकारभारविषयक बाबींकरितां एक व आर्थिक व्यवहाराकरितां एक अशा दोन आंतर-अमेरिकन समित्या नेमल्या जाणार आहेत. अमेरिकेंतील सर्व राष्ट्रांत एकोपा उत्पन्न व्हावा व त्यांमध्यें राजकीय आणि औद्योगिक क्षेत्रांत सहकार्य उत्पन्न व्हावें ह्या इच्छेनें हा करार करण्यांत आलेला आहे.

हॅवाना येथील करार एकाएकीं झालेला नसून आज कित्येक वर्षे चालू असणाऱ्या अमेरिकन परिषदांच्या कार्याचें मूर्त स्वरूप ह्या ठरावाच्या रूपानें दिसत आहे. पॅसिफिक व ॲटलँटिक महासागरांत होणाऱ्या प्रचंड खळबळीनें अमेरिकन राष्ट्रें आपल्या एकलकोंडेपणाच्या भुलींतून जागृत होत आहेत. युनायटेड स्टेट्स् ह्या प्रमुख अमेरिकन राष्ट्रानें सर्व अमेरिकन राष्ट्रांच्या संघटनेंत पुढाकार घ्यावा हें अगदीं सहाजिक आहे. परंतु ह्या राष्ट्रानें पूर्वी आपल्या वर्चस्वाखालीं असणाऱ्या प्रदेशांत साम्राज्यशाही गाजविली असल्यानें इतर अमेरिकन राष्ट्रांस युनायटेड स्टेट्सच्या पुढारीपणाबद्दल विश्वास वाटत नव्हता. परंतु अलीकडे फिलिपाईन बेटांस स्वातंत्र्य देऊन त्या व इतर अमेरिकन राष्ट्रांशीं आर्थिक सहकार्याचें धोरण युनायटेड स्टेट्सनीं चालूं ठेवलें आहे. ह्या उदारमनाच्या व सहकार्याच्या धोरणाचा इष्ट परिणाम होऊन सर्व अमेरिका खंडाचें आर्थिक व राजकीय एकीकरण होऊं पहात आहे.

खरें पाहिलें असतां, इंग्रज साम्राज्यशाहीस कंटाळून ज्या अमेरिकन वसाहतींनीं स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें त्यांनींच इतरांवर आर्थिक सोटेशाही गाजवूं पहाणें हें मनुष्यस्वभावाचा एक विकृत नमुना म्हणून गणलें पाहिजे. परंतु अमेरिकन युद्धापासून ज्याप्रमाणें इंग्रज सरकारनें योग्य तो बोध घेतला त्याप्रमाणें अमेरिकेनेंहि साम्राज्यशाहीच्या थोड्याच अनुभवानंतर आपलें धोरण बदललें हें अभिनंदनार्ह आहे. संहारक व संग्राहक अशा दोन्हीं प्रकारच्या साम्राज्यशाहीचे नमुने इंग्लंडच्या इतिहासांत सांपडतात. आयर्लंडचा पूर्वीचा इतिहास व हिंदुस्थान आणि बादशाहांच्या खास हुकमतीखालील वसाहती ह्यांचा आजचा अनुभव हीं दोन्हीं पाहिलीं तर सर्वसंग्राहक धोरण इंग्रज साम्राज्य सरकारनें एकसारखें न चुकतां अंगीकारलें आहे असें म्हणतां येणार नाहीं. किंबहुना साम्राज्य ही संस्थाच अशी आहे कीं त्यांत उच्च-नीच भाव स्वभावतःच अंतर्भूत आहे. परंतु एवढें मात्र खरें कीं इंग्रज सरकारचें अकट धोरण वसाहतींस व अंकित राष्ट्रांस बरोबरीचा दर्जा देऊन त्यांच्या खुषीच्या सहकार्यावर भिस्त ठेवावयाची, हें आहे.

ब्रिटिश 'साम्राज्यांत' ज्या स्वायत्त वसाहती आहेत त्यांच्यापुरती आजहि सन्माननीय सहकार्याची परिस्थिति उत्पन्न झालेली आहे. ज्यावेळीं साम्राज्याचे सर्व भाग स्वायत्ततेच्या दर्जास जाऊन पोहोंचतील तेव्हांच इंग्रज साम्राज्यशाहीचें संहारक स्वरूप पूर्णपणें नाहींसें झालें असें म्हणतां येईल. पूर्वीच्या कनिष्ठ दर्जातून औद्योगिक व राजकीय सुस्थितीस आलेल्या देशांस इंग्लंडबद्दल ऐतिहासिक असमाधान वाटलें तरी तात्कालिक अनुभवानें आपलेपणा वाटत राहतो हें स्वायत्त वसाहतींच्या इतिहासावरून सिद्ध होतें. ह्याच अनुभवाचा हिंदुस्थानाच्या बाबतींत अधीक धीरानें व मुत्सद्देगिरीनें इंग्लंड फायदा घेण्यास तयार होईल तर तें दोन्हीं राष्ट्रांचें सुदैव म्हटलें पाहिजे.

हॅवाना येथील ठरावाचें धोरण अमेरिकन व इंग्रज साम्राज्यशाहीच्या रूपांतराचें द्योतक आहे. उलट, जपान, इटली व जर्मनी हीं तीन राष्ट्रें आज ज्या प्रकारें इतर देश पादाक्रांत करीत आहेत त्यावरून त्यांना अजून संहारक साम्राज्यशाहीच मान्य आहे हें उघड दिसतें. इटली अजून बुभुक्षित लांडग्याप्रमाणें कोणतीं कोंकरें गिळंकृत करावी ह्याच विवंचनेंत आहे. जर्मन ब्याघ्राच्या मानानें इटलीची कुवत कमी असल्यानें आपणांस वाळवंटी आफ्रिकन मुलुखावरच तृप्त व्हावें लागतें किंवा काय अशी त्यास धुगधुग वाटत आहे. जर्मनीनें मात्र भूमध्य समुद्र व ॲटलँटिक महासागर ह्यांतील सर्व मोक्याच्या जागा आपल्या हुकमतीखालीं घेऊन सर्व युरोपखंड आपल्या आर्थिक व राजकीय दास्यांत ठेवण्याचा चंग बांधलेला दिसतो. गेल्या वर्षांत जेवढीं युरोपियन राष्ट्रें जर्मनीच्या कब्जांत गेलीं तेवढ्यांवर राजकीय व लष्करी हुकुमत जर्मनीची आहे ह्यांत आश्चर्य नाहीं. परंतु ह्या सर्व राष्ट्रांची आर्थिक घटना बदलून त्यांस औद्योगिक दृष्ट्या मागें ढकलण्याचे जे प्रयत्न जर्मनी करीत आहे ते कमालीचे स्वार्थप्रेरित व दीर्घद्वेषी आहेत असें म्हटलें पाहिजे.

अंकित राष्ट्रांत कोणतेहि महत्त्वाचे यांत्रिक कारखाने राहूं नयेत व शक्य तों त्या राष्ट्रांनीं शेतकीप्रधान असावें अशा तऱ्हेचे पद्धतशीर प्रयत्न होत आहेत. फ्रान्स, बेल्जम, नॉर्वे, स्वीडन ह्यांसारखीं औद्योगिक प्रगतीच्या बाबतींत जर्मनीशीं स्पर्धा करणारीं राष्ट्रेंहि जर्मन साम्राज्यशाहीच्या ह्या वरवंट्याखालीं वाटून निघत आहेत. हिंदुस्थानच्या पूर्वेस जपाननें चीन, मँचूको, इंडोचायना व इतर बेटें ह्यांमध्यें जर्मन कित्त्याचेंच वळण गिरविण्यास सुरुवात केली आहे. इंग्लंडच्या साम्राज्यशाहीच्या इतिहासावरून आज हें सिद्ध झालें आहे कीं अंकित राष्ट्रांस लोभी वृत्तीनें लुबाडण्याचा प्रयत्न केल्यास कोणत्याहि राष्ट्रास चिरकाल शांतता, स्वातंत्र्य अगर प्रगति ह्यांचा लाभ होत नाहीं. उलट लहानथोर राष्ट्रांनीं समानतेनें व सहकार्यानें वागल्यास त्यांत सर्वांच्या न्याय्य आकांक्षा पूर्ण होण्यास वाव असतो. ह्या मार्गानें अमेरिकन व इंग्रज धोरण पुष्कळच पुढें चालून गेलें आहे. हॅवाना येथील ठराव ह्या प्रगतीचें द्योतक आहे. उलट, जर्मनी व तिचे इटली आणि जपान हे दोन स्नेही अनुभवानें त्याज्य ठरलेल्या धोरणाचा निर्दयतेनें अवलंब करीत आहेत. सध्याच्या युद्धाकडे पहातांना वरील अनुभवाचा प्रत्येकानें मनःपूर्वक व निर्विकारपणें विचार करणें अगत्याचें आहे.

---

### गव्हाची लागवड कमी झाली

गेल्या वर्षी सबंद हिंदुस्थानांत मिळून एकूण ३ कोटि, ५४ लक्ष एकर जमीन गव्हाखालीं होती; चालू वर्षी लागवडींत ४% घट झाली आहे. गव्हाच्या दर एकरीं उत्पादनांत मात्र वाढ होत आहे.

## पैशाच्या वर्गावर्गीची सवलत

### सहकारी बँक्स असोसिएशनचें रिझर्व्ह बँकेस पत्र

( हिंदुस्थानातील व ब्रह्मदेशातील सहकारी संस्थांस मिळत असलेली, सरकारी तिजोऱ्यांमार्फत पैशाची वर्गावर्गी करण्याची सवलत काढून घेण्यांत आली आहे. मुंबई को. बँक्स असोसिएशननें त्यासंबंधांत आपलें म्हणणें पत्ररूपानें रिझर्व्ह बँकेच्या मुंबई कचेरीस कळवलें असून सदरहु सवलत चालू ठेवण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. असोसिएशननें पाठविलेल्या पत्राचा सारांश येथें दिला आहे. )

"सहकारी कामासाठी सहकारी पेढ्यांच्या पैशाची वर्गावर्गी व्हावयाची असतां ती सरकारी तिजोऱ्यांचे मार्फत मोफत होत असे. ही सवलत काढून घेण्यांत आली, ही गोष्ट इष्ट झाली नाहीं. मुंबई प्रांतांतील कित्येक ठिकाणीं अजून इतर बँकिंग संस्थांचा प्रसार झालेला नाहीं व अशा ठिकाणच्या सहकारी संस्थांच्या पैशाच्या देवघेवीस वरील सवलत काढून घेतली गेल्यामुळें अडथळा उत्पन्न होणार आहे. अनेक प्रकारच्या सहकारी संस्थांच्या जाळ्यामुळें मुंबई प्रांतांत इतक्या ठिकाणीं बँकिंगच्या सोई उपलब्ध झाल्या आहेत व ह्या सोई कायम टिकणें व त्या वाढणें पैशाची वर्गावर्गी मोफत अगर स्वस्त दरानें होण्यावर अवलंबून आहे. हिंदी मध्यवर्ती बँकिंग चौकशी कमिटीच्या बहुसंख्य रिपोर्टांत असेंच मत व्यक्त करण्यांत आलेलें आहे, व त्यास अखिल भारतीय सहकारी रजिस्ट्रारांच्या परिषदेनें पाठिंबा दिलेला आहे. मद्रास सहकारी चौकशी कमिटीचा ताजा अभिप्राय तेंच सांगतो. ज्यांनीं ह्या गोष्टीचा विचार केलेला आहे, अशा अधिकारी व्यक्ती हेंच सांगतात. पैशाच्या वर्गावर्गीस देण्यांत आलेल्या सवलतींमुळेंच लहान शहरांत व व्यापारी ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर ठेवी आकर्षित होऊं शकल्या व लहान ठिकाणीं सहकारी बँकांच्या शाखा स्थापन होऊन अगर अर्बन बँका निघून खेडेगांवींहि बँकिंगच्या सोई उपलब्ध होणें शक्य झालें. रिझर्व्ह बँकेनें ही सवलत काढून घेतल्यामुळें सर्वच सोसायट्यांचे खर्चांत वाढ होऊन सहकारी बँकिंगच्या प्रगतीस आळा बसेल.

"सहकारी सोसायट्यांस घावें लागणारें जादा कमिशन त्यांस सोसणें कठीण जाईल. शेतीच्या खालावलेल्या परिस्थितीमुळें शेतकी पेढ्यांस आपल्या कर्जदारांस सूट व व्याजाची कमी-अधिक प्रमाणांत माफी द्यावी लागली आहे. नवीन कर्जावरील व्याजाचा दरहि त्यांस उतरवावा लागला आहे. बाजारभाव अतिशय उतरलेला आहे, त्यामुळें शेतकरी वर्गांत त्राण उरलेलें नाहीं. अशा परिस्थितींत, सोसायट्यांस आपली आर्थिक स्थिति सुधारतो येईपर्यंत पैशाच्या मोफत देवघेवीची सवलत चालू रहाणें अत्यावश्यक आहे. असोसिएशनचें हें म्हणणें रिझर्व्ह बँक ऑफ इंडियापुढें, तिच्या पैशाच्या देवघेवीच्या ताज्या योजनेंत इष्ट ती सुधारणा करण्याचे दृष्टीनें, ठेवण्यांत यावें."

---

### युद्धमंत्रिमंडळाच्या सभासदांची पक्षवार वाटणी

सध्या ब्रिटिश युद्धमंत्रिमंडळाचे आठ सभासद असून त्यांपैकी पांच कॉन्सरवेटिव्ह पक्षाचे व तीन मजूर पक्षाचे आहेत. लिबरल पक्षाचे वाट्यास एकहि जागा नाहीं.

### हिंदी युद्ध-कर्ज

१८ सप्टेंबर, १९४० अखेर १७ कोटि, ७९३ लक्ष रुपयांचे हिंदी युद्ध-कर्ज खपलें आहे.

### श्री. ओगले ह्यांस सीलोन सरकारचें निमंत्रण

ओगले ग्लास वर्क्स लि. चे श्री. गुरुनाथराव ओगले हे सीलोन-सरकारच्या निमंत्रणावरून त्या देशांत कांचकारखाने काढून ते यशस्वी करण्याची शक्यता किती आहे, ह्या दृष्टीनें पहाणी करण्यासाठीं सीलोनला गेले आहेत. १९३४ सालीं सर सोराबजी पोचखानवाला ह्यांचे अध्यक्षतेखाली सीलोन सरकारनें बँकिंग चौकशी कमिशन नेमलें होतें, त्याची या प्रसंगानें आठवण होते. श्री. गुरुनाथराव ओगले ह्यांची सीलोन सरकारनें केलेली योजना ओगले मंडळीस भूषणावह आहे ह्यांत संशय नाहीं. श्री. ओगले ह्यांच्या कार्याचा विस्तार कसा वाढत आहे व कांचेच्या धंद्यांत ओगले मंडळीस किती मानाचें स्थान आहे ह्याचें हें ताजें उदाहरण आहे. श्री. गुरुनाथराव हे कोलंबोस सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत उतरले, त्यावेळीं "टाइम्स ऑफ सीलोन" नें त्यांचें स्वागत करून त्यांची मुलाखत घेतली. टाइम्सनें आपल्या ता. २५ सप्टेंबरच्या अंकांत श्री. ओगले ह्यांच्या कार्याचें व कर्तृत्वाचें वर्णन केलें असून ओगले ग्लास वर्क्सची पाठ थोपटली आहे. "सीलोनमध्यें कांचेचे कारखाने निघण्यास अनुकूल परिस्थिति आहे; सीलोन सरकारचें त्या संबंधांतील धोरण व्यावहारिक आहे; परदेशी माल आणून विकणाऱ्या व्यापाऱ्यांस देशी कारखाने नको असतात; त्यांच्या तक्रारीस मात्र वाजवी महत्त्व देतां कामा नये" असें मत श्री. ओगले ह्यांनीं व्यक्त केलें. श्री. ओगले ह्यांच्या सल्ल्याचा सीलोन सरकारास अतिशय उपयोग होईल, हें उघड आहे.

---

### दि बार्शी डाळ मॅन्युफॅक्चरिंग कं. लि., बार्शी

ह्या कंपनीचें वसूल भांडवल २५,९९० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ७,२८१ रुपयांचे आहेत. बार्शी येथें मोठ्या प्रमाणावर येत असलेल्या तुरीची व हरबऱ्याची डाळ बनविणें व त्यापासून दुभत्या जनावरांना योग्य असा कळणा, दाळमा व कोंडा बनविणें, हरबऱ्याच्या डाळीपासून बेसन बनविणें, शेंगदाणें, करडी व इतर गळिताच्या धान्यांपासून अद्यावत् मशिनरीच्या सहायानें तेल काढणें, इत्यादि कंपनीचे हेतु आहेत. कंपनीच्या स्वतःच्या मालकीची ११ हजार चौरस वार जमीन, इमारत व गोडाउन्स आहेत. ३० जून अखेर संपलेल्या वर्षी कंपनीस २,३५७ रुपये नफा झाला, भागीदारांस ६½% दरानें डिव्हिडंड मिळालें. यंदाचे वर्षी पुरेसा नफा न झाल्यामुळें मॅनेजिंग एजंटांनीं आपलें खरेदी-विक्रीवरील कमिशन घेतलें नाहीं, ह्याचा विशेष उल्लेख डायरेक्टरांच्या रिपोर्टांत आहे. कंपनी १९२२ सालीं स्थापन झाली, त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी तें वर्ष वगळून कंपनीनें भागीदारांस चांगलें डिव्हिडंड वाटलें आहे, त्याची सरासरी ८% पडते. कंपनीच्या ताळेबंदावरून तिचें काम व्यवस्थित रीतीनें चाललें असल्याचें स्पष्ट होतें. शेठ रामचंद्र मूळचंद हे कंपनीचे चेअरमन असून जाधवजी विरजी आणि कंपनीकडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

---

### नवीन सनदी नोकरांच्या शिक्षणाची व्यवस्था

हिंदुस्थानांत आय. सी. एस. ची परीक्षा उत्तीर्ण होणारांस आवश्यक तें शिक्षण, लढाई सुरू असेपर्यंत, हिंदुस्थानांतच देण्यांत येणार आहे. डेहराडून येथें त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली जाईल. आय. सी. एस. मधील एक अनुभवी अधिकारी, मि. पिनेल, ह्यांस त्यासाठीं नेमण्यांत येईल, असें कळतें.

## मुंबई प्रांतांतील शिक्षणप्रगति

### संस्था व विद्यार्थी

शिक्षणसंस्थांच्या एकूण संख्येंत ३,६८९ ची वाढ होऊन ती एकंदर १८,७२९ झाली आणि त्यांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येंत १,६३,०४० ची वाढ होऊन ती एकंदर १५,६६,४४१ झाली. विद्यार्थ्यांची संख्या प्राथमिक शाळांमध्यें सर्वांत जास्त वाढली. शहरें व गांवें यांची एकूण संख्या २१,६६८ असून त्यांपैकीं ११,८६२ ठिकाणीं शाळा आहेत आणि शाळा असलेल्या प्रत्येक शहराच्या किंवा गांवाच्या कक्षेंत सरासरी ६·५ चौरस मैल प्रदेश येतो. गेल्या वर्षी पुरुषांच्या एकूण लोकसंख्येपैकीं शेंकडा ११·३६ विद्यार्थी होते तर या वर्षी शेंकडा १२·७० होते. तसेंच गेल्या व या वर्षी स्त्रियांच्या एकूण लोकसंख्येपैकीं शेंकडा अनुक्रमें ४·०२ व ४·४८ विद्यार्थिनी होत्या.

सरकारमान्य शिक्षणसंस्थांमध्यें शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या १,७१,३२८ नें वाढून १५,३६,७६३ इतकी झाली. यांपैकीं हिंदू १२,३५,६८३, मुसलमान १,८८,२२२, हिंदी ख्रिश्चन ४४,७०१, पार्शी १७,७३४, युरोपियन, व ॲंग्लो इंडियन ५,४१२ आहेत. बाकींच्या जातींच्या विद्यार्थ्यांची संख्या एकूण ४५,०११ असून त्यांपैकीं जैन ४०,८४१, शीख ७६७ आणि ज्यू व इतर ३,४०३ आहेत.

### खर्च

शिक्षणावर होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चांत २०·५ लाख रुपयांची वाढ होऊन तो एकूण ३६१·४ लाख झाला आणि अप्रत्यक्ष खर्चांत ३·७ लाख रुपयांची वाढ होऊन तो एकूण ४८·९ लाख रुपये झाला. अशा रीतीनें शिक्षणाचा एकूण खर्च जो रु. ४,१०,३७,२१६ इतका झाला. तो पुढील मार्गांनीं भागविण्यांत आला.

| | रकम. | शेंकडा प्रमाण. |
|---|---|---|
| सरकारी फंड ... | १,८२,०१,८५९ | ४४·४ |
| बोर्डांचा फंड ... | ६७,५८,९०२ | १६·५ |
| फी ... | १,०८,८३,४५३ | २६·५ |
| इतर मार्ग ... | ५१,९३,००२ | १२·६ |
| एकूण... | ४,१०,३७,२१६ | १००·० |

प्राथमिक शाळांसाठीं, तपासणी, बांधकामें व दुरुस्त्या याबाबतचा खर्च सोडून बाकीच्या बाबतींत रु. १९१·९ लक्ष खर्च झाला. मान्य झालेल्या संस्थांमध्यें इमारतीसाठी रु. ११·७ लाख रुपये खर्च झाले.


### युनिव्हर्सिटी.

मॅट्रिक्युलेशन परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांची संख्या १३७५ नें वाढून ती १४,०८७ झाली. यांपैकीं ८,८३९ म्हणजे शेंकडां ६२·७ उमेदवार पास झाले. "आर्ट्स" कोर्सच्या इंटरमीजिएट परीक्षेला बसलेल्या १९६७ उमेदवारांपैकीं १२८९ म्हणजे शेंकडा ६५·५ पास झाले. ऑक्टोबर १९३८ व एप्रिल १९३९ मध्यें झालेल्या बी. ए. च्या परीक्षेंत पास झालेल्या उमेदवारांची संख्या ११६१ होती, मागील वर्षी ती ९६८ होती. व्यावसायिक पदव्याबाबतच्या परीक्षांमध्यें—वैद्यकीय परीक्षा सोडून—७३१, उमेदवार यशस्वी झाले. युनिव्हर्सिटीचा—व्यक्तिशः कॉलेजें सोडून परंतु खुद्द युनिव्हर्सिटीचीं दोन खातीं धरून—एकूण खर्च १४·३ लक्षांवर होता.


# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट | फुकट | फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

STEVENS CO. CROMWELL CONN U.S.A.

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून त्याचा तसाच आवाज होतो. याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. त्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

# सहकारी संस्थांचे अहवाल

## दि सारस्वत को. बँक लि. मुंबई

३० जून, १९४० रोजीं संपणाऱ्या वर्षअखेर वरील बँकेच्या पटावर १,५२७ सभासदांचीं नांवें असून त्यांनीं भरणा केलेल्या भांडवलाची रक्कम ९७,१२३ रुपये आहे. बँकेच्या रिझर्व्ह व इतर फंडांची एकूण रक्कम ५५,७५० रुपये आहे. बँकेनें सरकारी रोख्यांत गुंतविलेल्या रकमेची खरेदी किंमत ८,२१,१२७ रुपये आहे. बाजारभाव पडल्यामुळें बँकेजवळील रोख्यांची किंमत कमी झाली असली तरी बँकेनें २५,००० रुपयांचा इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड निर्माण करून त्याची तजवीज केली आहे. ताळेबंदांत ३,१७,४७१ रुपयांचीं कर्जें दाखविलीं आहेत. त्यांपैकीं घरांच्या प्रथम तारणावर (मार्च १९४०) दिलेली रक्कम १,०९,८६२ रुपयांचीं असून मालाच्या तारणावर ५२,७२९ रुपये, बँका व कंपन्यांच्या भागांवर ४६,८६४ रुपये, व एक अगर अधिक इसमांच्या जामिनकीवर ४५,७१६ रुपये दिले आहेत. एकूण येणें रकमेशीं थकबाकीचें प्रमाण फक्त ६% पडतें. बँकेचा वाढता प्रसार लक्षांत घेऊन स्वतःची इमारत बांधण्याकरितां ८५,००० रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. त्या इमारतींत भूमि अंतर्गत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय करण्यांत आली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस १०,६३६ रुपयांचा निव्वळ नफा झाला. त्यांतून २,९०० रुपये रिझर्व्ह फंडांत वर्ग करून घेतले आहेत. जागतिक अनिश्चित परिस्थितीचा विचार करून या वर्षी डिव्हिडंड वाटण्यांत आला नाहीं ही गोष्ट बँकेचा कारभार किती कसोशीनें व दूरदृष्टीनें चालविण्यांत येत आहे याचें उत्तम निदर्शक आहे. श्री. वा. पु. वर्दे यांच्या नेतृत्वाखालीं बँकेचा कारभार व्यवस्थित चालला असून बँकेची भरभराट होत आहे.

## नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सें. को. बँक लि.

वरील बँकेचा १९३९–४०सालचा अहवाल हा तिचा तिसावा वार्षिक अहवाल आला आहे. अहवाल सालअखेर बँकेचे वसूल भाग भांडवल १,१९,९४० रुपयांचें असून रिझर्व्ह फंड १,४०,१९६ रुपये, बुडीत कर्ज फंड ५२,४८७ रुपये, डिव्हिडंड इक्वलायझेशन फंड ८,०६७ रुपये, इमारत फंड ३०,५२५ व सेफ डिपॉझिट व्हॉल्टस रिझर्व्ह ११,००० रुपये असे निरनिराळे मुख्य फंड आहेत. यावरून बँकेच्या स्थैर्याची उत्तम कल्पना येईल. याशिवाय धर्मादाय, रिबेट, प्रचार, बँकेंतील नोकर लोकांचा प्रॉव्हिडंट फंड व रुग्णोपयोगी वस्तू यांसाठी निराळे फंड निर्माण करण्यांत आले आहेत. बँकेचा व्यवहार सालोसाल वाढत आहे. बँकेकडे एकूण ११,११,२०६ रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें इतर बँकांकडे २,२०,००० रुपयांच्या मुदत ठेवी ठेविल्या असून शेअर्स व सरकारी रोखे यांत ३,०२,४८८-१२-० रुपये गुंतविले आहेत. कॅश क्रेडिटवरील ४,०४,१८१ रुपयांच्या, १,९९,०८१ रुपयांच्या मेंबरांकडून व १,६१,५२५ रुपये धान्य वगैरे मालाचे तारणावर येणें रकमा आहेत. अहवालाचे वर्षअखेर बँकेनें ३०,००० रुपयांची स्वतःची इमारत बांधली. १०,००० रुपयांवर खर्च करून सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची व्यवस्थाहि करण्यांत आली आहे. त्याचा फायदा जनतेस अधिकाधिक होत आहे. बँकेस २२,८३० रुपयांचा नफा झाला त्यांतून ५% दरानें डिव्हिडंड वाटावें अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. उरलेल्या नफ्याची वांटणी कसोशीनें करण्याकडे डायरेक्टर बोर्डाचें लक्ष आहे.

## इचलकरंजी सें. को. बँक लि. इचलकरंजी

अहवाल सालअखेर बँकेचें वसूल भांडवल ३१,३५० रुपयांचें असून रिझर्व्ह, इमारत वगैरे फंडांची एकूण रक्कम २४,९५३ रुपये आहे. सोसायट्यांच्या रिझर्व्ह फंडठेवी ३५,०४६ रुपयांच्या, मुदतबंद ठेवी ९८,३८९ रुपयांच्या व चालू आणि सेव्हिंग्ज् खात्यांवार ठेवी १,८२,३३४ रुपयांच्या आहेत. शेअर्स सरकारी रोखे इत्यादि ठिकाणीं गुंतविलेली रक्कम ३३,८४७ रुपयांची असून कॅश क्रेडिट, गहाण कर्जें वगैरे १५३,८५४ रुपयांचीं दिलेलीं आहेत. वर्षअखेर बँकेस निव्वळ नफा ७,२१५ रुपये झाला त्यांतून भागीदारांना ६% डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. वार्षिक सभा २९-९-४० रोजीं झाली.

## मिरज प्रांत व कुची तालुका कों. सु. यूनियन लि., सांगली

वरील संस्था सहा वर्षांपूर्वी सांगली येथें १९३४ सालीं स्थापन झाली. सहकारी पतपेढ्यांच्या कामावर देखरेख ठेवणें, नवीन पतपेढ्या काढणें व सहकारी तत्त्वाचा प्रसार करणें या गोष्टींकडे यूनियननें लक्ष दिलें आहे. यूनियनच्या या कार्यानें "सांगली स्टेट सें. को. बँकेच्या कामकाजास (विशेषतः वसुलास) बरीच मदत झाली आहे." अहवालाचे वर्षअखेर यूनियनमध्यें ५८ सोसायट्या सामील आहेत. त्यांच्या सभासदांची एकूण संख्या ४,६२६ आहे. सामील सोसायट्यांच्या कामकाजाचे पुढील तुलनात्मक आकडे उद्बोधक आहेत. गतवर्षी ९२,०८४ रुपयांच्या व अहवालाचे वर्षी १,३४,३३५ रुपयांच्या ठेवी. सेंट्रल को. बँकेकडे यूनियनमध्यें सामील झालेल्या सोसायट्यांचें येणें कर्ज-गतवर्षी २,०६,८३७ रुपये, त्यांत थकबाकी ५३,८९८ रुपये; अहवालाचे वर्षी १,९४,३६३ रुपये त्यांत थकबाकी ४२,०५९ रुपये. सेंट्रल. को. बँकेनें दिलेल्या कर्जरकमेशीं थकबाकीचें प्रमाण यूनियनचे स्थापनेचे वेळीं ८४% होतें तें आतां २२% वर आलें आहे हें स्पृहणीय आहे. गेल्या वर्षी सामिल सोसायट्यांच्या सभासदांकडे ३,५०,१४१ रुपये कर्ज येणें होतें; अहवालाचे वर्षाचे शेवटीं ३,२७,०८२ रुपये कर्ज येणें उलट जिंदगी, रिझर्व्ह फंड व खेळतें भांडवल यांत गुंतविलेल्या रकमांचे आकड्यांत वाढ झाली आहे. यूनियनला सें. को. बँकेकडून मिळणारें कमिशन व सामील सोसायट्यांकडून वगैरे मिळणारी वर्गणी यांतून खर्च वजा जातां वर्षअखेर २५६ रुपयांचा नफा झाला. सांगली संस्थानच्या इतर भागांतील सहकारी संस्थांना यूनियनच्या देखरेखीचा फायदा मिळावा म्हणून यूनियनचें कार्यक्षेत्र नव्या पोटनियमानें 'सांगली संस्थान' ठरविण्यांत आलें आहे हें या संस्थेच्या उपयुक्ततेचें गमकच आहे. वार्षिक सभा ९-८-४० रोजीं झाली.


**धी बार्शी डाळ मॅन्युफॅक्चरिंग**

**कं. लि. बार्शी**

कंपनीचे सर्व भागीदारांना कळविण्यांत येतें कीं, ता. १५-९-४० च्या जनरल मीटींगमध्यें रु. ६-४-० सव्वासहा टक्के डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. त्याप्रमाणें डिव्हिडंड वारंट रवाना करण्यांत आलीं आहेत. तरी ता. १०-१०-४० नंतर कंपनीचे ऑफिसांतून डिव्हिडंडची रक्कम दिली जाईल.

बार्शी, ता. १८-९-४० — जाधवजी वीरजी आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस्

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११२—७ |
| ४% १९४३ | १०४—९ |
| ३½% बिनमुदत | ९१—१ |
| ३½% १९४७–५० | १०२—५ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९१—० |
| २¾% १९४८–५२ | ९५—१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०४—१२ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०३—२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१ ) | ११०—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १३४—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | १०२—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३८–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५१५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०३—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १२८–१२ |
| कराची ( १०० ) ९% | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१०—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १४२५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १६०५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | ९३—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ३½% | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | १००६–४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ७७२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ४ रु. | २०८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४६—० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | १८–१५ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ४०—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०६–१४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४२—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३३४—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. १ पै. | १७१५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १२०—० |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४१-१४-९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६२–१०–० |


स्पृहणीय यश
**बोनसचे दरांत २० टक्के वाढ**
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
**दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स**
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल्. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

**मधुमेहावरील औषध**
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस**
" जौहरे हुस्न " ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी स्तातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.
सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.
पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ ( A. P. ) अमृतसर–Amritsar.




एजंटः—

**महादेव गोविंद कुलकर्णी**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव, पुणें शहर.

---

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्निमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

---

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

---

**For Collegians**
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop

**SHEVAK BROS.**

*Work-Shop Address:*
153 Kasaba,
Poona 2

*Branch No. 1*
Shevak Quarters,
near Fergusson College
Poona 4

---

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

---

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द्. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

---

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.